दै. पुण्यनगरी, दि. 24-11-23

# जबरी चोरीतील फरार आरोपी मुद्देमालासह अटक



**नांदेड/प्रतिनिधी**

लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पिंपळगाव कोरका जाणाऱ्या रोडवरील जबरी चोरीतील एका चोरट्याला जेरबंद करण्यात स्थागुशाला यश आले असून ही कारवाई दि. २३ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. त्याच्याकडून २० हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत.

लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पिंपळगाव (कोरका ) जाणाऱ्या रोडवर दि.४ नोव्हेंबर रोजी दोन अज्ञात आरोपींनी माधव दुड्डे रा. चिकना ता. धर्माबाद यास अडवुन त्याला लुटले. या प्रकरणी लिंबगाव पोलीस ठाण्यात १२३/२३ नुसार कलम ३९४,३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल होता. या प्रकरणातील आरोपीचा शोध सुरु होता. दरम्यान दि. २३ नोव्हेंबर रोजी या प्रकरणातील आरोपी मामा चौक, नांदेड येथे असल्याबाबत माहीती मिळाल्याने त्यांनी तशी माहीती वरीष्ठांना देवुन स्थागुशाच्या पथकाने सापळा रचुन आरोपी दिपक ऊर्फ छक्या भोकरे (२४) रा. जुना कौठा रविनगर, नांदेड यास सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. त्यास गुन्हयाबाबत विचारपुस केली असता, त्याने व त्याचा दुसरा साथीदार आवेस ऊर्फ अब्बु शुटर शेख यांनी मिळुन लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२३/२३ हा गुन्हा केल्याची कबुली दिली. या गुन्ह्यात गेलेल्या मालापैकी २० हजार रुपये पोलिसांनी जप्त केले. त्यानंतर त्याला लिंबगाव पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहा. पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक सचिन सोनवणे, सहा.पोलीस निरीक्षक माधव केंद्रे, जमादार गुंडेराव करले, पोकॉ देवा चव्हाण, मारोती मोरे, चालक हेमंत बिचकेवार यांनी ही कारवाई केली.पोलीस अधीक्षकांनी या पथकातील कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

दै. पुण्यनगरी दि. 24-11-23



**नांदेड :** लिंबगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी करून फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी मुद्देमालासह अटक केली आहे.

# जबरी चोरीतील फरार आरोपीला अटक

## वीस हजारांचा मुद्देमाल जप्त : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सकाळ वृत्तसेवा**

नांदेड, ता. २३ : स्थानिक गुन्हे शाखेने जबरी चोरीतील फरार आरोपीला अटक केली आहे. पिंपळगाव (कोरका) रस्त्यावर माधव कामाजी दुड्डे (रा. चिकणा, ता.धर्माबाद) यांना अडवून आरोपींनी जबरी चोरी केली होती. त्याचा गुन्हा लिंबगाव पोलिस ठाण्यात दाखल झाला होता. तेव्हापासून पोलिस आरोपीच्या शोधात होते. स्थानिक गुन्हे शाखेने सदर आरोपीला गुरुवारी (ता.२३) मुद्देमालासह अटक केली आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी आरोपीचा शोध घेण्याचे निर्देश स्थानिक गुन्हा शाखेला दिले होते. त्यासाठी एक पथक तयार करण्यात आले होते. पथकाला मिळालेल्या माहितीनुसार मामा चौक नांदेड येथे जाऊन सदर पथकाने आरोपी दिपक उर्फ छक्या विनोद भोकरे (वय २४, रा. जुना कौठा, रवीनगर नांदेड) याला ताब्यात घेतले. त्याने मित्र आवेस उर्फ अब्बु शुटर शेख याच्यासोबत लिंबगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून २० हजार रुपये जप्त केले असून, त्यास लिंबगाव पोलिस ठाण्याच्या ताब्यात पुढील तपासणीसाठी आरोपी दिला आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय, सहायक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने, पोलिस उपनिरीक्षक सचिन सोनवणे, सहायक पोलिस उपनिरीक्षक माधव केंद्रे, गुंडेराव करले, देवा चव्हाण, मारोती मोरे, हेमंत बिचकेवार यांनी केली.